मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 25 जून 2024 | पान- 1

# शहरातील अनधिकृत शाळांना नोटीस

## शहरात अनधिकृत शाळा सुरू, पालकांची फसवणूक : शाळेबाहेर फलक लावण्याकडे चालढकल

**पिंपरी | प्रतिनिधी**

शासनाची कोणतीही मान्यता न घेता पिंपरी-चिंचवडमध्ये १२ खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा बिनधास्त सुरू आहेत. त्या शाळांच्या संस्थाचालकांना शाळा सुरू करू नये म्हणून नोटीस बजावली आहे. मात्र, त्या नोटिशीला केराची टोपली दाखवत शाळा सुरूच आहेत. या शाळांच्या बाहेर दर्शनी भागात अनधिकृत शाळांचे फलकही लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे शहरातील पालकांची फसवणूक होत आहे. या शाळांवर महापालिका शिक्षण विभागाकडून फौजदारी कारवाई होणार का, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.



शहरात १२ खासगी शाळा अनधिकृतपणे सुरू आोहेत. त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांची यादी महापालिका शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. शहरामध्ये खासगी प्राथमिक शाळा शासनाची परवानगी न घेता बिनदिक्कतपणे सुरू आहेत. या अनधिकृत शाळा बंद करण्यासाठी संबंधित शाळेच्या संस्थांना वारंवार कागदपत्रांची पूर्तता करून शासनाची मान्यता घ्यावी, असे शिक्षण विभागाकडून कळविले होते. त्यांना शाळा सुरू करू नये म्हणून नोटीसही बजावल्या आहेत. मात्र या नोटिशीकडे दुर्लक्ष करत संस्थाचालकांनी शाळा अनधिकृतरीत्या सुरू ठेवण्यात आल्या आहेत.

शहरात कित्येक वर्षांपासून अनधिकृत शाळांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. शाळा हे कमी वेळेत मुबलक पैसा कमविण्याचे साधन बनले आहे. समाजातील विविध क्षेत्रातील लोकांनी मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा सपाटा लावला आहे. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क वसुलीही करतात. परंतु; आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत.

दरम्यान, या शाळांना नोटीस बजावण्याबरोबरच शाळांच्या मुख्य दर्शनी भागावर 'अनधिकृत शाळा' असा फलक लावण्याचे आदेश दिले होते. परंतु; प्रत्यक्षात शहरातील १२ पैकी एकाही शाळेच्या आवारात अनधिकृत शाळा असल्याचा फलक लावलेला नाही. या शाळांमध्ये जादा दराने शुल्क आकारणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणे, शाळांमध्ये गणवेश, शैक्षणिक साहित्य घेण्याची सक्ती करणे, जादा दराने साहित्य विकणे, असा प्रकार करत पालकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात आलेली आहे.

### शाळा तपासणीकडे दुर्लक्ष

महापालिका हद्दीत दरवर्षी नवनवीन शाळा सुरू होतात. त्या शाळांकडून शासनाची परवानगी घेतली जात नाही. महापालिका शिक्षण विभागातील शिक्षणाधिकाऱ्यांकडून नियमितपणे तपासण्या होत नसल्यामुळे या अनधिकृत शाळांचे पेव फुटले आहे. कोणाच्या वरदहस्ताने अनधिकृत शाळा सुरू राहतात, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र, अशा शाळेचा आकडा वाढत चालल्याने विद्यार्थ्यांसह पालकांचे नुकसान होत आहे.

### या 12 अनधिकृत शाळा

» महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शाळांचे सर्वेक्षण केल्यानंतर १२ अनधिकृत शाळा आढळून आल्या. यामध्ये माउंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल; कासारवाडी, पीपल ट्री एज्युकेशन ट्रस्ट; गांधीनगर-पिंपळे निलख, चैतन्य इंग्लिश मीडियम स्कूल; विशाल नगर-पिंपळे निलख, आयडीएल इंग्लिश स्कूल; जवळकरनगर-पिंपळे गुरव, स्टारडम इंग्लिश मीडियम स्कूल; चऱ्होली, लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल; चिंचवडेनगर, नवजीत विद्यालय; लक्ष्मीनगर-वाल्हेकरवाडी, किड्स स्कूल; पिंपळे सौदागर, एम.एस. स्कूल फॉर किड्स; सांगवी, क्रिस्टल मॉडर्न स्कूल; चिंचवड, डी. एम. के. इंग्लिश स्कूल; कासारवाडी, ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल; चिंचवड या शाळांचा समावेश आहे.

# 3 कोटी 'एसएमएस'साठी महापालिकेने खर्चले 24 लाख!

## एका एसएमएसचा दर 0.08 पैसे : कर संकलन विभागाला आणखी एक कोटी एसएसएमची गरज

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची बिले भरण्यासाठी मोबाइलवर एसएमएस केले जातात. तब्बल ३ कोटी बल्क एसएमएस मालमत्ताधारकांच्या मोबाइलवर पाठवण्यासाठी २४ लाखांचा खर्च करण्यात आला आहे.

मालमत्ताकराची बिले वसूल करण्यासाठी कर संकलन विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मालत्ताधारकांना मालमत्ताकराची बिले थेट त्यांच्या मोबाइलवर पाठविली जातात. एसएमएसद्वारे थेट लिंक दिली जात आहे. त्यामुळे मालमत्ताधारकांना बिलाची रक्कम समजते. त्यांना स्मार्ट मोबाइलद्वारे तत्काळ ऑनलाइन माध्यमातून ते बिल भरता येते. त्यामुळे बिल भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. परिणामी, कर संकलन विभागाच्या वसुलीत वाढ झाली आहे.

कर संकलन विभागाकडून २०२३-२४ या आर्थिक वर्षात



तब्बल २ कोटी एसएमएस मालमत्ताधारकांना पाठविण्यात आले आहेत. त्यासाठी गो टू मार्केट इंडिया या एजन्सीला १६ लाखांचे शुल्क अदा करण्यात आले. एका एसएमएसचा दर ०.०८ पैसे आहे. कर संकलन विभागाला आणखी एक कोटी एसएसएमची गरज आहे. त्यासाठी ८ लाख रुपये खर्च आहे. त्यासाठी संबंधित एजन्सीला पुन्हा आदेश देण्यात आला आहे. या खर्चाला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

# शहरातील पावणेचार लाख मिळकतींचे होणार सर्वेक्षण

## लगतचे जागामालक, भाडेकरूंना मोबदला देण्यासाठी आवश्यक रक्कम मान्य करण्याची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील स्व-वापराच्या निवासी मिळकतींना मिळकतकरात ४० टक्के सवलतीच्या अनुषंगाने पालिकेकडून प्रायोगिक तत्त्वावर तपासणी सुरू करण्यात आली होती. त्याचा आधार घेऊन आता संपूर्ण शहरात ही मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेद्वारे ३ लाख ७२ हजार मिळकतींचे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी विभागाने अतिरिक्त ५०० कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ देण्याची मागणी सामान्य प्रशासन विभागाकडे केली होती. त्यानुसार, अतिरिक्त ३७५ कर्मचाऱ्यांची कुमक देण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी याबाबतचे आदेश दिले. तसेच पीटी-३ अर्ज भरण्याची मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.




पालिकेच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकराची देयके वितरित केल्यानंतर पीटी-३ (PT-3) फॉर्म भरण्याची मुदत वाढविण्याबाबत मोठ्या प्रमाणात नागरिक, सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती. आता या ३ लाख ७२ हजार ४४० मिळकतींचे सर्वेक्षण पालिकेच्या सेवकांकडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन करण्याचे काम मंगळवारपासून सुरू करण्यात आले आहे. पालिका कार्यक्षेत्रातील स्व-वापराच्या निवासी मिळकतीस ४० टक्के सवलतीच्या अनुषंगाने वडगाव धायरी, वडगाव बुद्रुक व हिंगणे या भागात प्रायोगिक तत्त्वावर ६ मे पासून भेट देण्यात आली होती. मिळकतधारक स्वतः राहात असल्यास, त्यांचेकडून ४० टक्के सवलतीचा पीटी-३ फॉर्म नागरिकांना हस्तांतरित करण्यात आला होता. मिळकतधारक स्वतः राहात असल्यास, याबाबत मिळकतधारकांनी हा पीटी-३ फॉर्म भरताना सादर केलेल्या कागदपत्रानुसार तपासणी करण्यात येत होती.

याचाच आधार घेऊन आता महापालिका पूर्ण शहरभर ही तपासणी मोहीम राबवणार आहे.

### पीटी-३ अर्ज भरण्याची मुदतवाढ

» महापालिका हद्दीतील ज्या मिळकतींची ४० टक्के सवलत जीआयएस सर्वेक्षणाअंतर्गत १ एप्रिल २०१८ पासून रद्द करण्यात आली. तसेच, ज्या नव्याने बांधकाम झालेल्या निवासी मिळकतींची आकारणी ४० टक्के सवलत न देता १ एप्रिल २०१९ पासून पुढे झालेली आहे, अशा मिळकतींधारकांसाठी महानगरपालिने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यातील सगळ्यात महत्त्वपूर्ण निर्णय हा आहे की, पीटी-३ अर्ज भरण्याची मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे.

यात नागरिकांकडून तत्काळ पीटी-३ भरून घेण्यात येणार आहे. घरात स्वतः राहात असल्यासच मिळकतधारकाला सवलत मिळणार आहे. नागरिकांसाठी ही शेवटची सवलत असणार आहे. यानंतर पीटी-३ फॉर्म भरण्याची संधी दिली जाणार नाही. मिळकतींची संख्या मोठी असल्याने आणि महिनाभरात हे काम पूर्ण करायचे उद्दिष्ट ठेवल्याने मिळकतकर विभागाला अतिरिक्त मनुष्यबळाची गरज होती. यासाठी अतिरिक्त आयुक्तांनी अतिक्रमण विभागाकडील ७५ साहाय्यक निरीक्षक, घन कचरा व्यवस्थापन विभागाकडील १५० आरोग्य निरीक्षक, पंधरा क्षेत्रीय कार्यालयातील प्रत्येकी पाच असे ७५ मुकादम आणि अन्य विभागातील ७५ टंकलिपिक उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईपर्यंत हे मनुष्यबळ कर आकारणी विभागाशी संलग्न राहणार असून त्यांच्यावर केवळ सर्वेक्षणाची जबाबदारी राहाणार आहे. त्यांना कर वसुलीचे कुठलेही अधिकार राहाणार नाहीत, असे आदेशात नमूद केले आहे. २४ जूनपासून हे अतिरिक्त मनुष्यबळ सर्वेक्षणाचे काम सुरू करणार आहे.

# पुण्यातील हॉलच्या बाथरूममध्ये अल्पवयीन मुलांचे ड्रग्स सेवन

## फर्ग्युसन रोडवरील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुले दारू पिताना, तर बाथरूममध्ये ड्रग्सचे सेवन करतानाचा व्हिडीओ व्हायरल

**पुणे | प्रतिनिधी**

पोलिसांनी ड्रग्स प्रकरणात ललित पाटील या आरोपीला अटक केली होती. त्या आरोपीला अटक केल्यानंतर ससून रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र तो आरोपी ससून रुग्णालयामधून पळून गेल्याची घटना घडल्यानंतर आरोपीला मदत करणाऱ्यांवर पोलिस आयुक्तांनी कारवाई केली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी ठिकठिकाणी छापे टाकून हजारो कोटींचा ड्रग्सचा साठा देखील जप्त केला होता. या सर्व घटना थांबत नाही. तोवर पुणे शहरातील सततचा वर्दळीचा आणि सर्वाधिक हॉटेलची संख्या असलेल्या फर्ग्युसन रोडवरील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुले दारू पिताना, तर बाथरूममध्ये ड्रग्सचे सेवन करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओनंतर संबधीत विभागाचे मंत्री, हॉटेल चालक, प्रशासनातील अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आमदार रविंद्र धंगेकर, ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे.



### शंभूराज देसाई हे कसाई सारखे वागतात : आमदार रविंद्र धंगेकर

पुणे शहर आणि आसपासच्या भागात पहाटे तीन वाजेपर्यंत पब हे चालविले जात आहेत. या विरोधात पोलिस आयुक्त कार्यालयासमोर पब चालकांची यादी वाचून दाखविली होती. आता पुन्हा ती वेळ आणू नका, पोलिसांनी पब चालकांवर कारवाई करावी, अन्यथा पुन्हा पोलिस आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. तसेच विभागाचे मंत्री शंभूराज देसाई हे केवळ कारवाई करु असे आश्वासन देतात. मात्र ते काही करत नसून ते कसाई सारखे वागतात, अशा शब्दांत काँग्रेस पक्षाचे आमदार रविंद्र धंगेकर यांनी शंभूराज देसाई यांच्यावर निशाणा साधला. तर येणाऱ्या अधिवेशनात या विरोधात आवाज उठविणार असल्याची भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

> काही तरुण अमली पदार्थांचे सेवन करत असतानाचे व्हिडिओ समोर आले आहेत.हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी बोलणे झाले असून ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला आहे.त्या पोलीस स्टेशनच्या निरीक्षकांना आणि जबाबदार घटकांना तातडीने निलंबित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवाय संबंधित हॉटेलचे चालक मालक यांच्यावर कठोर कारवाई करण्याचेही निर्देश दिले आहेत. सदरील प्रकार आणि त्यामुळे आपल्या पुण्याची होणारी बदनामी कधीही सहन केली जाणार नाही.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री.**

### शंभुराज देसाई यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा : सुषमा अंधारे

मागील आठ ते नऊ महिन्यांपासून ड्रग्स प्रकरणी भूमिका मांडत आहे. मात्र सत्तेच्या बळावर राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत आहेत. धमक्या दिल्या जातात, अब्रूनुकसानीचे दावे करू यासह अनेक प्रकारच्या धमक्या दिल्या जातात. तसेच आजचा एका हॉटेल मधील व्हिडीओ समोर आल्याने उत्पादन शुल्क विभागाची अब्रू चव्हाट्यावर आली आहे. त्यामुळे शंभुराज देसाई आपण कोणावर अब्रूनुकसानीचा दावा ठोकणार आहात, तसेच अमली पदार्थांचा सुळसुळाट सुरू आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यात, शंभुराज देसाई अपयशी ठरले असून त्यांनी राजीनामा द्यावा, त्याच बरोबर पुणे जिल्हा उत्पादन शुल्क विभागाचे राजपूत यांना निलंबित करून कारवाई करावी अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली.

# विक्रमी उत्पन्न देणाऱ्या नाट्यगृहाकडे दुर्लक्ष

## भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहात प्रेक्षक आणि कलाकारांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच नाट्यगृहात विक्रमी उत्पन्न देणाऱ्या भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहाकडे महापालिकेने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे विविध भौतिक सुविधांअभावी प्रेक्षक आणि कलाकारांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. २०२२ पासून नाट्यगृह प्रशासनाद्वारे महापालिकेकडे भौतिक सुविधांच्या दुरुस्तीसाठी मागणी करण्यात येत असतानाही महापालिकेद्वारे या मागण्यांना केराची टोपली दाखविण्यात येत आहे. नाट्यगृहामधील विविध समस्या सोडविण्याची मागणी प्रेक्षक आणि कलाकारांमधून होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले चिंचवडमधील प्रा. रामकृष्ण मोरे या नाट्यगृहाची आसनक्षमता बाराशे असून ते शहर परिसरातील आसनक्षमतेत पहिल्या क्रमांकाचे नाट्यगृह आहे. मोरे नाट्यगृहाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात एक कोटी आठ लाख ९९ हजार १५० रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळवून दिले. तर भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहाची आसनक्षमता साडेनऊशे असून ते आसन क्षमतेत शहर परिसरात दुसऱ्या क्रमांकाचे नाट्यगृह आहे. या नाट्यगृहाने चालू आर्थिक वर्षात एक कोटी १२ लाख ६८ हजार २९६ रुपयांचे विक्रमी उत्पन्न महापालिकेला मिळवून दिले आहे. असे असतानाही कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या देखभालीकडे महापालिकेने पाठ फिरवली आहे.

कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहातील सुमारे ६० खुर्च्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. स्वच्छतागृहातील भांडी फुटलेली आहेत. खिडक्यांचा काचा निखळल्या आहेत. बाहेरील बाजूस असलेल्या स्वच्छतागृहामधील मैलापाणी रस्त्यावरून वाहत आहे. छतावरील पाण्याच्या टाकीला गळती आहे. नाट्यगृहातील काही दरवाजांचे कडीकोयंडे तुटलेले आहेत. शटर व ग्रील दरवाजांचीही दुरवस्था झाली आहे. ग्रीन रूम आणि व्हीआयपी रूममधील फर्निचर तुटलेल्या अवस्थेत आहे. खिडक्यांवरील पडदेही फाटलेले आहेत. अग्निविरोधासाठी ठेवलेल्या लोखंडी पाण्याच्या टाक्या गंजल्याने त्यातून पाणी गळत आहे. नाट्यगृहाचे मुख्य प्रवेशद्वारासह उत्तर व पश्चिम प्रवेश द्वारही नादुरुस्त अवस्थेत आहे. नाट्यगृहातील रंगमंच्यावरील पडदे, रोप व विंग यांची दुरवस्था झाल्याने ते नवीन बसविणे गरजेचे आहे.



### नाट्यगृहाच्या प्रवेशद्वार कमानीवर नाव हवे

» नाट्यगृहाचे प्रवेशद्वार पुणे-नाशिक महामार्गाच्या सेवा रस्त्याला लागून आहे. मात्र, येथे असलेल्या कमानीवर नाट्यगृहाचे नाव लिहिलेले नाही. वाढलेल्या झाडांमुळे नाट्यगृहावर लिहिलेले नाव रस्त्यावरून दिसत नाही. त्यामुळे येथे येणाऱ्या नवख्या प्रेक्षकांना नाट्यगृह शोधावे लागते. त्यामुळे प्रवेशद्वारावर असलेल्या कमानीवर नाट्यगृहाचे नाव असणे गरजेचे आहे.

> “ नाट्यगृहाच्या संपूर्ण दुरुस्तीसाठीची तरतूद महापालिकेच्या आर्थिक अंदाजपत्रकात केलेली नाही. त्यामुळे नाट्यगृहातील किरकोळ स्वरूपाची दुरुस्ती करण्यात येईल. मात्र, संपूर्ण दुरुस्तीसाठी आणि भौतिक सुविधांसाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे. या प्रक्रियेला सहा महिने लागण्याची शक्यता आहे..
>
> - शैलेंद्र चव्हाण, उपअभियंता, स्थापत्य विभाग, इ क्षेत्रीय कार्यालय

### अखेर वातानुकूलित यंत्रणा झाली सुरु

» एप्रिल २०२३ ला कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा (एसी) बंद पडली. ही यंत्रणा सुरू व्हावी म्हणून ‘सकाळ’ने याचा वारंवार पाठपुरावा केला होता. महापालिकेने जुनी वातानुकूलित यंत्रणा संपूर्णपणे बदलून नव्याने यंत्रणा बसविली. ही वातानुकूलित यंत्रणा गुरुवारपासून (ता. २०) सुरू झाली आहे.

### अद्यापही मेटल डिटेक्टर नाही

» कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहांमध्ये कंपन्या, संस्था आदींच्या कार्यक्रमाबरोबर शाळांच्या स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतात. असे असतानाही या नाट्यगृहात अद्यापपर्यंत मेटल डिटेक्टर बसविण्यात आलेले नाही. व्हीआयपींच्या कार्यक्रमासाठी आणलेला मेटल डिटेक्टर कार्यक्रम झाल्यावर पुन्हा काढण्यात येतो. मात्र, सामान्य नागरिकांचे काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# शरद पवार राष्ट्रवादीचे तुषार कामठे 'ॲक्शन मोड'वर..!

## प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे अ आणि फ क्षेत्रीय कार्यालयात अधिकाऱ्यांना धरले धारेवर..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

काल (दि. 23 जून) रोजी शहरात झालेल्या पावसामुळे शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर चार फुटांपर्यंत पाणी साचल्याच्या घटना घडल्या, ठिकठिकाणी नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले, महापालिकेने पावसाळ्यापूर्वी ड्रेनेज वहिनी स्वच्छता न केल्याने तसेच ठिकठिकाणी आपत्कालीन यंत्रणा सज्ज नसल्याने नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जायला लागले, पहिल्याच पावसात ही अवस्था असेल तर पुढच्या तीन महिन्यामध्ये पावसाळ्याला शहर कसे तोंड देणार? असा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे आक्रमक भूमिका घेत ॲक्शन मोड वर आल्याचे आज दिसून आले.



आज सकाळी तुषार कामठे यांनी निगडी येथील अ प्रभाग तसेच फ प्रभाग क्षेत्रीय कार्यालयात बहुसंख्य कार्यकर्त्यांसह जनसंवाद बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले, दोन दिवसात संत तुकाराम महाराजांचे व संत तुकाराम महाराजांचे पालखी प्रस्थान शहरातून मार्गस्थ होणार असताना लाखो वारकरी बांधवांना महापालिकेच्या गलथान कारभाराचा त्रास होण्याची शक्यता असल्याची भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

स्मार्ट सिटीच्या नावाखाली सत्ताधारी पुढाऱ्यांनी आजवर कोट्यवधींचा भ्रष्टाचार केला असून, इथे नागरिकांना सध्या मूलभूत सुविधा महापालिका प्रशासन देऊ शकत नाही, एकीकडे शहर विकासाच्या नावाने मोठमोठ्या प्रकल्पांच्या घोषणा करायच्या आणि दुसरीकडे एका पावसाने नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरावे अशी दयनीय अवस्था सत्ताधारी व महापालिका प्रशासनाच्या गलथानपणामुळे झाली आहे, पावसाळ्याच्या व पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी महापालिका प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात व आवश्यक त्या यंत्रणा उभाराव्यात, ड्रेनेज व्यवस्था स्वच्छ सुरळीत करणे, आपत्कालीन यंत्रणा बळकट करणे, त्याचबरोबर वारकरी बांधव व शहरवासीयांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी सुविधा तात्काळ पुरविण्याच्या सूचना यावेळी तुषार कामठे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.

एकंदरीतच लोकसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीला मिळालेल्या प्रचंड यशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वजण सज्ज झाले आहेत, त्यातच शहराध्यक्ष तुषार कामठे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आवाज उठविण्यात अग्रेसर व आक्रमक भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे.

सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, उपाध्यक्ष रेखा मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश युवक सरचिटणीस प्रशांत सपकाळ, शहर उपाध्यक्ष दिलीप पानसरे, अनिल भोसले, काशिनाथ जगताप, विनोद धुमाळ, शहर सरचिटणीस सचिन गायकवाड, शहर सचिव योगेश सोनवणे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, राष्ट्रवादी ओबीसी विभाग शहराध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष सागर भुजबळ, भोसरी विधानसभा अध्यक्ष संतोष माळी, सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष मयूर जाधव, सेवादल शहराध्यक्ष अरुण थोपटे, शरदचंद्र संजीवनी आरोग्य योजना भोसरी विधानसभा अध्यक्ष मंगेश उर्फ राजू खंडागळे व इतर सर्व शहर कार्यकारणी व पदाधिकारी यांचा समावेश होता.

# शैक्षणिक साहित्य खरेदीची लगबग सुरूच

## नवीन शैक्षणिक वर्षास सुरुवात त्यामुळे विविध दुकानांवर पालकांची व विद्यार्थ्यांची गर्दी

**पुणे | प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षास सुरुवात झाली आहे.त्यामुळे नवीन ॲडमिशन घेतलेले विद्यार्थी, पालक वर्ग पाठ्यपुस्तके, वह्या, पेन, दप्तर, कंपॉस पेटी, गणवेश, बुट व पायमोजे आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदीस इंदापूर, निमगाव केतकी, वालचंदनगर, भिगवण येथे विविध दुकानांवर पालकांची व विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. त्यासाठी लागणारे सर्व साहित्याच्या खरेदीसाठी पालक व विद्यार्थी शहरातील विविध, शैक्षणिक साहित्याच्या दुकानांवर खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्रामीण भागातील पालक खरेदीसाठी शहरात येत आहेत.

आपल्या पाल्याची शैक्षणिक प्रगती दिवसेंदिवस वाढविण्यासाठी,आणि त्याच्या शैक्षणिक दर्जात कुठेही कमी पडता कामा नये.शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यामुळे, इंदापूर तालुक्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यावयाच्या शिकवणी सुरू झाली आहे.

यासाठी पाल्यास आवश्यक असणाऱ्या सर्व साहित्याची शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस खरेदी करण्यास तालुक्याचे ठिकाण असणाऱ्या इंदापूर शहरात, तसेच निमगाव केतकी, भिगवण, बावडा अशा मोठ्या गावात ग्रामीण भागातून पालक शहरातील शैक्षणिक साहित्य विक्रीच्या दुकानातून साहित्य खरेदी करण्यास येत आहेत.

नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात नेहमीच नव्या नवलाईने होते. त्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावरील ही नवलाई पाहून पालकांकडून मुलांसाठी शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याला अग्रक्रम दिला जातो. 15 जून रोजी शाळेची पहिली घंटा वाजणार असल्याने पाऊस आणि ऐनवेळी होणारी धावपळ पाहता शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांनी मुलांसह बाजारात गर्दी केलेली आहे. तर शासनाच्या शिक्षण विभागाकडून पहिली ते आठवीपर्यंत पाठ्यपुस्तके मोफत दिली जातात. त्यामुळे पाठ्यपुस्तके व्यतिरिक्त नव्या वह्या, दप्तर, कंपास, डबे, पाण्याची बाटली, शालेय पादत्राणे यासह अन्य काही गरजेच्या वस्तूंची सातत्याने नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला आवर्जून खरेदी केली जाते. फर पासून तयार केलेली दप्तरे पर्स किंवा सॅक च्या आकारात बाजारात उपलब्ध आहेत.



### साहित्याच्या किमतीत 40 टक्के वाढ

» मागील वर्षाच्या तुलनेत यंदा शालेय साहित्यांच्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्के वाढ झाल्याचे दिसून येत आहे. एका वहीमागे ७, १०, १५, २० असा फरक पडला आहे. गेल्यावर्षी शंभर पानी वही १५० रुपये डझन होती.ती सध्या २७० ते २८० रुपये डझन, दोनशे पानी वही ३०० रुपये डझनची आता ४२० रुपये डझन, फुलस्केप पानी वही ४०० रुपये डझन होती ती ५४० रुपये, अशा दराने उपलब्ध आहेत.

> केजीच्या वर्गापासून तर कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत साहित्य खरेदीला गत आठवड्यापासून सुरवात झालेली असून विद्यार्थ्यांच्या साहित्यांची आवडी निवडी या वेगवेगळ्या प्रकारच्या असल्याने अनेक प्रकारचे साहित्य दुकानात विक्रीस आणले आहे
>
> - रोहित भगत, फ्रेंड्स बुक स्टॉल विक्रेता

### बळीराजा कर्जाच्या बोजाखाली दबला

» इयत्ता पहिलीपासूनच पदवीपर्यंत विद्यार्थ्यांच्या पुस्तके, वह्यांच्या किमती गगनाला भिडलेले आहेत. मागील काही वर्षापासून पाऊस नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहे. त्यातच पहिल्यांदाच पावसाने मृग नक्षत्रापासून सुरुवात केल्याने शेतीतील मेहनतीचा खर्च बियांचा खर्च व खते असा मोठा खर्च शेतकऱ्यांना उसनेवारी करून करावा लागत असून त्यातच शैक्षणिक साहित्य खरेदीसाही ही उसनवारी करावी लागत असल्याने बळीराजा कर्जाच्या बोजाखाली दबला जात आहे.

### स्कूल बॅगचे आकर्षण...

» मोटू-पतलू, छोटा भीम, स्पायडर मॅन, बॅनटॅन, पॉकिमन, बार्बी, डोरेमॉन, ॲंग्री बर्डस् अशी विविध चित्रे असलेल्या स्कूल बॅगला बच्चे कंपनीची सर्वात जास्त पसंती असून या स्कूल बॅगच्या किमती १५० ते ६०० रुपयांच्या दरम्यान आहेत.

---

# इंदापूर तालुक्यातील 2449.5 हेक्टरवर पेरू बहराला

## पिकातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्चच जादा होत असल्याने शेतक-यांकडून बागांना पसंती

**पुणे | प्रतिनिधी**

खरीप हंगाम व रब्बी हंगामातील पिकातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्चच जादा होत असल्याने इंदापूर तालुक्यातील शेतकरी पेरू फळ बागेकडे वळाला आहे. 2023-24मध्ये 2449.5 हेक्टरवर पेरूच्या बागा बहरल्या आहेत, अशी माहिती इंदापूर तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब रुपनवर यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षा पूर्वी शेतकरी खाण्यासाठी पेरू असावा म्हणून घरासमोर विहिरीच्या बाजूला व काही बांधावरती पेरूची झाडे लावत होता. मात्र अलीकडच्या काळात हमखास उत्पन्न देणारे पीक म्हणून शेतकरी पेरूच्या फळबागेकडे वळाला असल्याने तालुक्यात मोठ्या प्रमाणात पेरूच्या बागा बहरू लागल्या असल्याचे चित्र दिसत आहे.

पेरूची बाग ही उत्पन्न मिळवून देणा-या बागा झाल्या आहेत. त्यामुळे खरीप व रब्बी हंगामातील पिकांना बगल देत शेतकरी पेरू फळ बागेकडे वळाला आहे. पेरू देशांतर्गत व परदेशी बाजारपेठेतही जाऊ लागला आहे.

कोणत्याही जमिनीत व हवामानात येणारे पीक असल्यामुळे बरेचसे शेतकरी या पिकाकडे वळल्याचे दिसत आहे. कारण पूर्वी इंदापूर तालुक्यातील शेतकरी द्राक्ष व डाळिंब या बागाकडेच वळाला होता मात्र सतत बदलत असलेल्या वातावरण बदलामुळे बागा जैविक व अजैविक ताणास बळी पडत असल्यामुळे तसेच जागतिक मंदी मुळे सध्या इंदापूर तालुक्यातील शेतकरी बागेकडे वळाला असून तैवान, पिंक, व्ही एन आर व गुजरात रेड या जातीच्या पेरूची लागवड केली जात आहे.



> खरीप व रब्बी हंगामापेक्षा फळबागा परवडत आहेत कारण रब्बी व खरीप हंगामातील पिकांसाठी लागणारे बी बियाणे, खते, कामासाठी लागणारे मजूर, पाणी आदींचा खर्च काढला तर उत्पन्नापेक्षा खर्च जादा होत आहे.त्यामुळे शाश्वत फळपीक म्हणून शेतकऱ्यांची पेरूला पसंती दरही चांगला मिळत असल्याने सध्या शेतकरी पेरू फळबागेकडे वळला आहे
>
> - सिद्धेश्वर थोरात, शेतकरी, लोणी देवकर.

### 70 टक्के पिंक तैवान

» तालुक्यातील एकूण पेरू क्षेत्रापैकी 70 टक्के पिंक तैवान, 20 टक्के व्ही एन आर व 10 टक्के गुजरात रेड जातीची लागवड दिसून येत आहे.तालुक्यातील समशीतोष्ण हवामानामुळे उन्हाळी,पावसाळी व हिवाळी हंगाम धरता येतो त्यामुळे तालुक्यातील शेतकरी या पेरूच्या फळबागांकडे वळाला आहे.

> पेरू फळामध्ये असणारे क जीवनसत्व हे संत्रा व मोसंबी पेक्षा पाचपट अधिक असल्याचे सिद्ध झाल्यामुळे पेरू खाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. भविष्यामध्ये आपल्या भागातील शेतकरी शास्त्रीय ज्ञानाचा अचूक वापर करून उच्च प्रतीचे पेरू उत्पादन घेतील
>
> - राजेंद्र वाघमोडे, संचालक, महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्र.